राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषद / नगरपंचायत यांना "विशेष रस्ता अनुदान" चा निधी वितरीत करण्याबाबत.

सन २०२३-२४ साठी (लेखाशिर्ष ३०५४ ००२२) अंतर्गत देगलूर नगरपरिषद जि. नांदेड करिता रक्कम रु. २.०० कोटी

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-रस्ताअ-२०२३/प्र.क्र.४२२-ब(४७)/नवि-१६**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ०४ जुलै, २०२३.**

**संदर्भ :-**

(१) शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ९० /नवि-१६ दिनांक १६ जानेवारी, २०१६.
(२) शासन परिपत्रक क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ९० /नवि-१६, दिनांक १० जून,२०१६.
(३) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३,दिनांक १२ एप्रिल,२०२३

**प्रस्तावना :-**

राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत यांना रस्ता व तद्अनुषंगिक बाबींचा विकास करण्यासाठी "विशेष रस्ता अनुदान " देण्यात येते. संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये याबाबतचे निकष विहीत करण्यात आले होते. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने, "विशेष रस्ता अनुदान " या योजनेअंतर्गत संदर्भाधीन क्रमांक (३) अन्वये राज्यातील नगर पालिकांना / महानगरपालिकांना कामे मंजूर करुन निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

**"विशेष रस्ता अनुदान"** योजनेंतर्गत रस्ता व तद्अनुषंगिक बाबींचा विकास करण्यासाठी अनुदान देण्यात येते. **देगलूर नगरपरिषद जि. नांदेड करिता रक्कम रु. २,००,००,००० /- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी मात्र)** इतका निधी **"देगलूर नगरपरिषद क्षेत्रातील राधेश्याम जालनेकर यांच्या घरापासून ते नागसेन चौक ते कोंडेकर व हाकीकर सर यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व एका बाजूस नाली करणे"** या कामाकरिता वितरीत करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

२. "विशेष रस्ता अनुदान" अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना मंजूर अनुदानाच्या मर्यादेत सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता संबधित महानगरपालिका /नगरपरिषद यांनी संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयानुसार प्राप्त करून घ्यावी.

३. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांची कार्यान्वयन यंत्रणा **"नगरपरिषद"** राहिल.

४. "विशेष रस्ता अनुदान" योजनेकरीता संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहित केलेल्या सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वानुसारच निधीचा विनियोग होईल याबाबत आवश्यक ती दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

५. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

६. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

७. तांत्रिक मान्यता दिलेली कमी किमतीची (रू.१० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) एकत्रित करून शासनाकडून एकत्रित प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात आलेली आहे. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई- निविदा पद्धतीनेच करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

८. जिल्हाधिकारी, यांची ज़बाबदारी ख़ालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व: उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे. प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

९. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

**१०.** यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन,संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत **आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई** यांचेकडे सादर करावी.

**११.** सदर निधी दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ करिता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

**१२.** या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, **नांदेड** यांना नियंत्रक अधिकारी तसेच, जिल्हा प्रशासन अधिकारी, **नांदेड** यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, **नांदेड** / जिल्हा प्रशासन अधिकारी, **नांदेड** यांनी सदरचा निधी कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

१३. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "विशेष रस्ता अनुदान " या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तीची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

१४. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ करीता वितरीत केलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१५. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिका-याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करू नये.

१६. या लेखाशिर्षाखाली एक वर्षावरील जुने संक्षिप्त देयक प्रलंबित असल्यास निधी आहरीत करू नये, असे प्रस्ताव वित्त विभागाची सहमती घेण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावेत.

१७. आहरण व संवितरण अधिका-याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदर निधी अनुदान दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१८. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी कार्यान्वयन यंत्रणा यांना कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरीत करण्यात यावा. सदरचा निधी जिल्हाधिकारी यांनी इतरत्र थेट वळता करू नये.

१९. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१११८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२१व दि.२८ मार्च,२०२२ अन्वये कार्यवाही करावी.

२०. यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष ३०५४, मार्ग व पूल, ०४, जिल्हा व इतर मार्ग, ८००, इतर खर्च, (०२) (०१) रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी नगरपरिषदांना / महानगरपालिकांना विशेष मार्ग अनुदान, ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (३०५४ ००२२), या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

२१. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ४ एप्रिल,२०२३ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे.सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अ.क्र.९ मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे

२२. संदर्भाधीन क्र. (१), (२) व (३) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्रीकांत आंडगे)
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८
३. विभागीय आयुक्त, **छत्रपती संभाजीनगर**
४. जिल्हाधिकारी, **नांदेड**
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

८. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड
११. जिल्हा कोषागार अधिकारी, **नांदेड**
१२. जिल्हा प्रशासन अधिकारी, नांदेड
१३. मुख्याधिकारी, देगलूर नगरपरिषद, जि. नांदेड
१४.वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.
१५. कार्यासन नवि-४ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (नवि-१६), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.